जा.क्र. ५८९०/२०१९
धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
दिनांक - १२/१२/२०१९

**परिपत्रक क्र. ५७३ दिनांक १२/१२/२०१९**

या अधिकारिणीच्या असे निदर्शनास आले आहे की, कार्यालयामध्ये तक्रारींचा ओघ येत आहे, परंतु सदर तक्रारी न्यायिक आहेत किंवा प्रशासकीय आहेत, याची योग्य पडताळणी न करता कार्यालयातील निरीक्षकांना चौकशी करण्याचे निर्देश दिले जातात, त्यामुळे बराच गोंधळ होतो. अशा कार्यपध्दतीमुळे निरीक्षक आणि कर्मचारी यांचेवर कामाचा बोजा वाढत राहतो. सदरच्या तक्रारींची वेळेत दखल घेणे कठीण होत असलेमुळे अधिकारी, कर्मचारी तसेच पक्षकारांमध्ये वाद होण्याच्या घटना घडत असतात.

२. संस्था कार्याभिमुख करणेकरीता, राज्यातील सर्व धर्मादाय सह आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांना निर्देश देण्यात येतात की, कार्यालयात दाखल होणारे अर्ज/तक्रारी/पत्र यांचे स्वरुप तपासून (प्रशासकीय किंवा न्यायिक) त्यांची विभागवारी करण्यात यावी. जर तक्रार/अहवाल/पत्र हे न्यायिक स्वरुपाचे असतील आणि अर्ज/याचिका निकष विहीत केलेनुसार नसतील, तर पीठासीन अधिकाऱ्याने शक्य असल्यास तक्रारदारास बोलावून अथवा लिखित स्वरुपात तक्रारदार/अर्जदाराने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम, १९५१ मध्ये विहीत केलेल्या निकषांचा आधार घेऊन अर्ज/याचिका सादर करण्याचे निर्देश द्यावेत. तसे अनुपालन न केल्यास त्यावर दप्तर दाखल (filed) असे किंवा यथोचित निर्णय त्वरीत घ्यावेत.

३. कार्यप्रणाली अधिक परिणामकारक होणेकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

१) सर्व अधिक्षक/जनसंपर्क अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी कार्यालयात दाखल होणाऱ्या अर्ज/तक्रारींची तपासणी करुन त्यांची वरीलप्रमाणे विभागणी करावी आणि त्याप्रमाणे सदर अर्ज/तक्रारी संबंधित अधिकारी यांचेपुढे योग्य त्या आदेश/निर्देशाकरीता त्वरीत सादर करावेत.

२) सर्व पीठासीन अधिकारी यांनी निरीक्षकांना निर्देश देण्यापुर्वी न्यासाच्या योग्य प्रशासनाकरीता आणि व्यवस्थापनाकरीता तसेच निवाड्याकरीता निरीक्षक चौकशी व त्यांचा अहवाल आवश्यक आहे का याची खात्री करावी.

४. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत कार्यवाही करणेकरीता, अर्ज/तक्रारी दाखल करणारी व्यक्ती ही लाभाधिकारी अथवा सदर न्यासाशी हितसंबंध असणारी आहे किंवा कसे याची काटेकोरपणे पडताळणी करावी.

५. सर्व अधिकाऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी तात्काळ वरील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

SGMehare
12-12-19

(संजय ग.मेहरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. सर्व अधिक्षक/जनसंपर्क अधिकारी
६. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)

D:\SWATI\Circulars\Marathi Circular 7.docx